

# डॉ. शंकरराव चव्हाण राज्यस्तरीय सूक्ष्माध्यापन कौशल्य व्हिडीओ सादरीकरण स्पर्धा (2021 – 22)

श्री.शारदा भवन एज्युकेशन सोसायटी नांदेड संचलित अध्यापक महाविद्यालय नांदेड यांच्या वतीने दरवर्षी राज्यस्तरीय सूक्ष्माध्यापन स्पर्धा आयोजित केली जाते पण कोविडच्या पार्श्वभूमीवर या स्पर्धेत खंड पडला असून यावर्षी ही स्पर्धा व्हिडिओच्या माध्यमातून व्हर्च्युअल प्लॅटफॉर्मवर घेण्याचे ठरले आहे..

2021 - 22 या शैक्षणिक वर्षासाठी डॉ. शंकरराव चव्हाण राज्यस्तरीय सूक्ष्म अध्यापन कौशल्य व्हिडीओ सादरीकरण स्पर्धा आयोजित करण्यात येत आहे. ही स्पर्धा **व्हर्च्युअल प्लॅटफॉर्म म्हणजेच व्हिडीओ** या माध्यमाद्वारे घेण्यात येणार आहे.. या स्पर्धेसाठी प्रत्येक महाविद्यालयातून पाच विद्यार्थ्यांचा संघ भाग घेऊ शकेल.

प्रत्येक कौशल्यासाठी एक विद्यार्थी याप्रमाणे फक्त पाच विद्यार्थी भाग घेऊ शकतील किंवा कोणत्याही कौशल्यासाठी पाचपेक्षाही कमी विद्यार्थी भाग घेऊ शकतील. ***ही स्पर्धा फक्त बी.एड. मध्ये शिकत असणा-या विद्यार्थ्यांसाठीच आहे.***

# स्पर्धेसाठीचे नियम:

१. स्पर्धेसाठी कोणतीही प्रवेश फी नाही. तसेच स्पर्धा ही मराठी व इंग्रजी या दोन्ही माध्यमातून घेतली जाईल. या स्पर्धेत खालील पाच कौशल्यासाठी भाग घेता येईल. पण एका विद्यार्थ्याला कोणत्याही एकाच कौशल्यासाठी आपले नाव पाठविता येईल. ती कौशल्ये पुढीलप्रमाणे:

**अ. प्रस्तावना कौशल्य**
**ब. चेतकबदल कौशल्य**
**क. स्पष्टीकरण कौशल्य**
**ड. दृक्-श्राव्य साधनांचा वापर कौशल्य**
**ई. फलकलेखन कौशल्य**

२. स्पर्धेसाठी निकाल जाहीर झाल्यानंतर बक्षिसे दिली जातील. बक्षीसवितरण समारंभात ही बक्षिसे मान्यवरांच्या हस्ते दिली जातील. ती खालील प्रमाणे :

**प्रथम विजेता स्पर्धक : १००१ रुपये**
**द्वितीय विजेता स्पर्धक : ७५१ रुपये**
**तृतीय विजेता स्पर्धक : ५०१ रुपये**

वरील बक्षिसे प्रत्येक कौशल्यासाठी जर कमीत कमी 10 पेक्षा जास्त स्पर्धक असतील तरच कौशल्यानुसार वेगळी बक्षिसे दिली जातील. अन्यथा सर्व कौशल्यांमधून तीन स्पर्धकांचीच बक्षिसांसाठी निवड केली जाईल. यासंदर्भात निर्णय घेण्याचा अंतिम अधिकार महाविद्यालय प्रशासनाचा असेल.

३. तसेच प्रत्येक सहभागी विद्यार्थ्यांना स्पर्धेत भाग घेऊन आपले कौशल्य सादर केल्याबद्दल ऑनलाईन प्रमाणपत्र देण्यात येईल..

४. स्पर्धकांवर परीक्षकांचा निकाल बंधनकारक राहील. त्याबाबत कोणत्याही तक्रारी वा सबबी गृहीत धरल्या जाणार नाहीत. स्पर्धेसाठी खालील निकषांचा उपयोग केला जाईल. ते निकष पुढीलप्रमाणे:

**अ..कौशल्यासाठी आशयाची निवड**
**ब. व्हिडीओची क्वालिटी**
**क. संबंधित कौशल्याचे पाठटाचण**
**ड. कौशल्याची प्रभावी मांडणी**
**ई. कौशल्यात उपकौशल्यांचा समावेश**

५. स्पर्धेसाठी स्पर्धकाने आपल्या सूक्ष्म अध्यापन व्हिडिओ दिलेल्या सूचनांनुसार व कौशल्यावर आधारीत तयार करावयाचा आहे

६. स्पर्धेसाठी पाठविलेले टाचण स्वत: तयार केलेले असावे. इतर प्रकाशित वा दुस-याचे कॉपी केलेले टाचण चालणार नाही. तसे आढळल्यास संबंधित स्पर्धकाला स्पर्धेतून बाद केले जाईल.

७. स्पर्धेसाठी पाठविलेले टाचण प्रकाशित करण्याचा अधिकार (कॉपी राईट) महाविद्यालय प्रशासनाकडे राखून ठेवला आहे. त्याबाबत कोणतीही तजवीज केली जाणार नाही.

८. प्रत्येक महाविद्यालयातून किमान पाच विद्यार्थी एका कौशल्यासाठी एक याप्रमाणे पाच किंवा पाचपेक्षा कमी विद्यार्थी पाठविता येतील. प्रत्येक स्पर्धकान आपल्या कौशल्याचा वेगळा व्हिडीओ पाठवावा. एकत्र संघ म्हणून पाठवू नये. तसे महाविद्यालयाच्या प्राचार्यांचे पत्र प्रत्येक विद्यार्थ्याने Pdf स्वरूपात व संबंधित कौशल्याचे पाठटाचण (संगणकीय टाईप केलेले) तसेच संबंधित टाचण मराठीत असेल तर **कृतीदेव 55 मध्ये** व **14 फॉन्टसाईज** व इंग्रजीत असेल तर **Times New Roman Font, size 12** मध्ये असावे तसेच टाचण Colour pdf स्वरूपात सोबत पाठवावे..

९.. व्हिडीओमध्ये सुरुवातीला विद्यार्थी व त्याच्या महाविद्यालयाची माहिती, कौशल्याचे नाव व संबंधित कौशल्याचे पाठ टाचण सादर करण्यासाठी पहिली दीड मिनिटे देण्यात आली आहेत. (नमुना पाठ टाचण कसे असावे याबाबत चेतकबदल कौशल्याच्या पाठाचे नमुना टाचण देण्यात आले आहे.) त्यानंतर पाच ते सहा मिनिटांचा संबंधित कौशल्याचा व्हिडिओ सादर केलेला असणे आवश्यक आहे. संबंधित व्हिडीओ खाली दिलेल्या गुगल क्लासरूमच्या लिंकवर पाठवावा :.

https://classroom.google.com/c/NDQyNTQwODk5OTA1?cjc=qyxfuus

१०. स्पर्धेसाठी व्हिडीओ पाठविण्याची अंतिम तारीख **25 जानेवारी 2022** ही असेल. **25 जानेवारीनंतर आलेल्या व्हिडीओंचा स्पर्धेसाठी विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.**

**प्राचार्य**
**डॉ. अनुराधा राऊत**
**9421756169**

**अधिक माहितीसाठी संपर्क :**

1. प्रा. डॉ विशाखा म्हस्के 9890850161.

2. प्रा. एम.आर. जोशी 9890438493

3 प्रा. डॉ संजीवनी चव्हाण 91759444460

4. श्री. राम कदम 9545395486